# ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन, पुणे द्वारा प्रकाशित
## 'मैत्री पुस्तकांशी' मालिकेअंतर्गत 'कर्तृत्वाच्या प्रेरक कहाण्या' संच - सूची
### (१ पानी पाठपोट छपाई व जाड लॅमिनेट केलेली ४० पुस्तके)

| क्र. | गोष्ट कशाची | लेखाचे नाव | व्यक्तीचे नाव | कोण आहे? | स्त्री/ पुरुष | लेखक |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | गोष्ट जिद्दीची | माझ्या छात्र जीवनातले संस्मरणीय प्रसंग | डॉ. जयंत नारळीकर | शास्त्रज्ञ | पुरुष | स्वतः |
| २२ | गोष्ट प्रगतीची | एकमेकां साहाय्य करू... | कावेरी शिवरकर | लघु उद्योजिका | स्त्री | स्वतः |
| २३ | गोष्ट कर्तृत्वाची | संस्कारांची संजीवनी | नवनाथ मुन्हे | सरपंच | पुरुष | स्वतः |
| २४ | गोष्ट विकासाची | मी 'पण' तिचे फुलवूया... | डॉ.संजीवनी केळकर | वैद्यकीय अधिकारी | स्त्री | स्वतः |
| २५ | गोष्ट उद्योगाची | खुल्या विद्यापीठातील शिक्षण | शरद दांडेकर | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| २६ | गोष्ट धडपडीची | स्त्रीचा अर्थपूर्ण विकास ! | सुवर्णा गोखले | स्त्रीशक्ती प्रबोधन | स्त्री | स्वतः |
| २७ | गोष्ट ध्येयाची | केल्याने होत आहे रे... | युवराज म्हेत्रे | शासकीय अधिकारी | पुरुष | स्वतः |
| २८ | गोष्ट प्रगतीची | क्षमता जाणून घेण्याचे परीस क्षण... | प्रवीण दवणे | लेखक | पुरुष | स्वतः |
| २९ | गोष्ट अनुभवाची | काही हरवलंय..काही गवसलंय... | विशाखा शिंदे | विद्यार्थिनी | स्त्री | स्वतः |
| ३० | गोष्ट कसोटीची | मोहाचा क्षण | वामन प्रभुदेसाई | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| ३१ | गोष्ट धडपडीची | अभ्यास आणि आसनं यांचा 'योग' होतो तेव्हा... | प्राची शेंबेकर | विद्यार्थिनी | स्त्री | स्वतः |
| ३२ | गोष्ट कसोटीच्या प्रसंगाची | ती अविस्मरणीय सहल | डॉ. प्र.ल. गावडे | शिक्षणतज्ज्ञ | पुरुष | स्वतः |
| ३३ | गोष्ट ध्येयाची | ध्येयवेड्या सुजाताचे नवे क्षितिज | सुजाता | खेळाडू | स्त्री | सुषमा निसळ |
| ३४ | गोष्ट माणुसकीची | माणुसकीचा विश्वास | ब्रिगेडीअर प्रताप जोशी | ब्रिगेडियर | पुरुष | स्वतः |
| ३५ | गोष्ट प्रगतीची | व्यासंग आणि प्रयोगशीलता हेच माझे खरे व्यासपीठ! | समीर गोखले | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| ३६ | गोष्ट संघर्षाची | संघर्ष जीवनाचा | सुमन कोकाटे | सरपंच | स्त्री | स्वतः |
| ३७ | गोष्ट प्रेरणेची | कबड्डीनेच माझे जीवन घडविले | शांताराम जाधव | कबड्डीपटू | पुरुष | स्वतः |
| ३८ | गोष्ट विकासाची | ज्ञानदीप चेतवूया... | कांचन परुळेकर | सामाजिक कार्यकर्ता | स्त्री | स्वतः |
| ३९ | गोष्ट अभिमानाची | कायनेटिकची जन्मकथा | अरुण फिरोदिया | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| ४० | गोष्ट प्रेरणेची | दिवस तरुणाईचे | यमाजी मालकर | संपादक | पुरुष | स्वतः |

# ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन, पुणे द्वारा प्रकाशित
## 'मैत्री पुस्तकांशी' मालिकेअंतर्गत 'कर्तृत्वाच्या प्रेरक कहाण्या' संच - सूची
### (१ पानी पाठपोट छपाई व जाड लॅमिनेट केलेली ४० पुस्तके)

| क्र. | गोष्ट कशाची | लेखाचे नाव | व्यक्तीचे नाव | कोण आहे? | स्त्री/ पुरुष | लेखक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोष्ट जिद्दीची | ध्येयप्राप्तीचा अवघड प्रवास ! | विजय राठोड | आयुक्त | पुरुष | स्वतः |
| २ | गोष्ट संघर्षाची | ज्याचे हाती तंत्रज्ञान... | कैलास जगदाळे | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| ३ | गोष्ट अनुभवाची | फँड्रीने दिली ओळख ! | सोमनाथ अवघडे | बाल कलाकार | पुरुष | स्वतः |
| ४ | गोष्ट प्रगतीची | घेऊया उंच भरारी ! | अनिल सूर्यवंशी | कृषी अभ्यासक | पुरुष | स्वतः |
| ५ | गोष्ट उत्कर्षाची | श्रम उद्योगांचे कल्पतरू... | दीपक शिंदे | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| ६ | गोष्ट अभिमानाची | साहसी निर्णय ! | उमेश झिरपे | गिर्यारोहक | पुरुष | स्वतः |
| ७ | गोष्ट जिद्दीची | ते पदक अजूनही स्मरणात आहे | मेघना परांजपे | जलतरणपटू | स्त्री | स्वतः |
| ८ | गोष्ट विकासाची | एकमेकां साहाय्य करू... | शंकर उबाळे | सरपंच | पुरुष | स्वतः |
| ९ | गोष्ट जिद्दीची | सावरपाडा एक्सप्रेस | कविता राउत | खेळाडू | स्त्री | सुरेंद्र पाटसकर |
| १० | गोष्ट ध्यासाची | एकच ध्यास- बहादूरवाडीचा विकास !! | वसंत घुले | सामाजिक कार्यकर्ता | पुरुष | स्वतः |
| ११ | गोष्ट उद्योगाची | गोष्ट एका उद्योगाची | सचिन रणवरे | सरपंच | पुरुष | स्वतः |
| १२ | गोष्ट धडपडीची | संस्काराची शिदोरी... | रामदास आरगडे | उद्योजक | पुरुष | स्वतः |
| १३ | गोष्ट प्रगतीची | नृत्य 'बोलके' झाले | सुचेता चाफेकर | नृत्यांगना | स्त्री | स्वतः |
| १४ | गोष्ट अभिमानाची | शब्दांचा परीसस्पर्श... | यमाजी मालकर | संपादक | पुरुष | स्वतः |
| १५ | गोष्ट प्रगतीची | नवी वाट | दिनेश | छोटा उद्योजक | पुरुष | रेणू दांडेकर |
| १६ | गोष्ट भरारीची | खेळाच्या शाळेने मला घडवले... | सविता कोकाटे | कबड्डीपटू | स्त्री | स्वतः |
| १७ | गोष्ट विकासाची | विकासाच्या झगमगत्या वाटेने | आशिष गावडे | संशोधक | पुरुष | स्वतः |
| १८ | गोष्ट प्रगतीची | थेंबाथेंबाने साठवूया माया | शंकर आमीलकंठवार | पाणलोट क्षेत्र विकास | पुरुष | स्वतः |
| १९ | गोष्ट कर्तृत्वाची | कसोटीच्या क्षणांनी दिशा दाखवली ! | आशा सुर्वे | बचत गट प्रमुख | स्त्री | स्वतः |
| २० | गोष्ट जिद्दीची | असाही एक अनुभव | एका मुला विषयी | लघु उद्योजक | पुरुष | सुवर्णा गोखले |

ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन द्वारा 'मैत्री पुस्तकांशी'- मालिकेअंतर्गत

**कर्तृत्ववान व्यक्तींच्या जडणघडणीच्या प्रेरणादायी कहाण्या**

**१**



◀ डॉ. विजय राठोड
(आयुक्त)

**गोष्ट जिद्दीची**

# ध्येयप्राप्तीचा अवघड प्रवास!

नमस्कार, मी डॉ. विजय चंद्रकांत राठोड. मला सांगताना अतिशय आनंद होतो आहे, की मी यु. पी. एस. सी. ची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालो. आता मी आय. ए. एस. च्या प्रशिक्षणासाठी जाण्याची तयारी करीत आहे. बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्यातील ठाकरवाडी तांडा ते आय. ए. एस. ऑफिसर होईपर्यंतचा माझा हा प्रवास तुम्हाला सांगू इच्छितो.

माझे वडील राज्य राखीव पोलिस दलामध्ये 'दौंड' येथे नोकरीस होते. पोलिस दलामध्ये असल्याने घरामध्ये एक प्रकारची शिस्त होती. वडील नेहमी नोकरीनिमित्त बाहेर गावीच असत. त्यामुळे शिक्षणाची पार्श्वभूमी नसलेली, पण त्याचे महत्त्व जाणणारी आई आम्हाला सकाळी उठवून अभ्यासाला बसवत असे. प्राथमिक शिक्षण 'संत तुकडोजी विद्यालय दौंड' येथे झाले. त्यानंतर २००१ साली वडिलांची बदली बीड येथे झाली. शालेय शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दोन महिने झाल्याने आम्हा भावांना प्रवेश देण्यासाठी एकही शाळा तयार नव्हती. आमच्या गावाकडील एक शिक्षक 'चंपावती विद्यालय' येथे शिक्षक होते. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे ८-१० दिवसांनी आम्हाला प्रवेश मिळाला. दहावीचे महत्त्वाचे वर्ष असल्याने मी सुरुवातीपासूनच अभ्यासाला लागलो. त्यामुळे दहावीच्या परीक्षेत शाळेमध्ये प्रथम येण्याचा मान मी मिळवला.

पुढील शिक्षणासाठी बीड येथील 'बलभीम' महाविद्यालय, येथे प्रवेश घेतला. २००५ साली इ. बारावीमध्ये ९३% गुण घेऊन जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला. जिल्ह्यातून प्रथम आल्याने मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते कौतुक झाले. त्यावेळी त्यांनी मला विचारले की, मोठे होऊन कोण होणार आहेस? त्यावेळेस मी त्यांना लगेच सांगितलं, मला 'कलेक्टर' व्हायचं आहे, तेव्हाच मी कलेक्टर होण्याचा निश्चय केला होता.

पदवीसाठी मी पुणे येथील एम.बी.बी.एस. या अभ्यासक्रमासाठी बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजचा कालावधी कधी संपला कळालेच नाही. इंटर्नशिप चालू झाल्यानंतर आता काय करायचे हा मोठा प्रश्न होता. एम.डी. ला ॲडमिशन घ्यावी की, पूर्ण वेळ स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करावा या संभ्रमात होतो. घरच्यांसोबत चर्चा केली असता त्यांनी पूर्ण वेळ स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी वापरावा असे सांगून पूर्ण पाठिंबा दिला.

२०११ साली मी पहिली परीक्षा दिली त्यामध्ये पास होऊन मुख्य परीक्षेसाठी पात्र झालो. मुख्य परीक्षा दिल्यानंतर निकाल यायला बराच कालावधी होता त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी लातूर येथील उपसंचालकांकडून मंजुरी मिळवली तरी त्यानंतर तब्बल एक महिन्याचा काळ

या पुस्तकाची किंमत - रु. १५/- 'व्यक्तींच्या प्रेरणादायी कहाण्या'अंतर्गत याचप्रकारच्या ४० पुस्तकांचा संच सवलतीच्या किंमतीत रुपये ५००/- मध्ये उपलब्ध! (साठा मर्यादित)
याशिवाय विद्यार्थी, पालक, शिक्षकांसाठी ज्ञान प्रबोधिनी द्वारा १०० हून अधिक पुस्तके प्रकाशित, अनेक प्रकाशनाच्या मार्गावर! अवश्य संग्रही ठेवा! (संपर्क मागील बाजूस)


सत्कार स्वीकारताना

उलटूनही मला रूजू करून घेतले नाही. त्याचवेळेस मी मुलाखतीला पात्र असल्याचा निकाल आला. मी आनंदाने मुलाखतीसाठी गेलो ;पण निकालामध्ये अंतिम यादीमध्ये स्थान मिळाले नव्हते.

पुन्हा पुण्याला येऊन अभ्यासाला सुरुवात केली त्यासाठी ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे प्रवेश घेतला. पुन्हा पूर्व परीक्षा दिली. पास झालो व मुख्य परीक्षेच्या अभ्यासाला लागलो. मुख्य परीक्षा दिली पुन्हा निकालाला अवकाश असल्याने पैशाची अडचण दूर करण्यासाठी रेसिडेन्शिअल डॉक्टर म्हणून शवविच्छेदन विभागामध्ये रुजू झालो. आपण यावेळेस नक्कीच पास होऊ असे वाटत होते; पण भ्रमनिराशा झाली. केवळ १२ मार्कस् कमी पडल्याने मी मुलाखतीस पात्र झालो नाही. खूप निराशा आली, पण जिद्द मात्र सोडली नाही.

यावेळेस घरच्यांनी मला खूप मानसिक आधार दिला. २०१३ साली यु.पी.एस.सी. ने अभ्यासक्रमामध्ये बदल केला. त्यामुळे मी दिल्लीला जाण्याचा निर्णय घरच्यांना सांगितला; पण प्रमुख अडचण पैशांची होती, पण आईने सांगितले की, घरातील सगळे सोने बँकेत गहाण ठेवून तुला एक लाख रुपये देत आहोत. तू फक्त अभ्यास कर. पैशाची चिंता करू नको.

घरच्यांच्या अपेक्षांचे ओझे घेऊन पूर्ण तयारीने पुन्हा अभ्यासाला लागलो. दररोज मी १७-१८ तास अभ्यास करत असे. पुन्हा मुख्य परीक्षा दिली. यावेळेस मुलाखतीस पात्र होऊ असा विश्वास होता. खर्च बराच झाल्याने तसेच मित्रांकडून बरेच पैसे उसने घेतल्याने खूप कर्ज झाले होते. साधारण एक ते दीड लाख रुपये एवढे. हे कर्ज फेडण्यासाठी पुन्हा त्याच शवविच्छेदन[1] विभागामध्ये रेसिडंट डॉक्टर म्हणून रुजू झालो.

फेब्रुवारी २०१४ मध्ये मुख्य परीक्षेचा निकाल लागला मुलाखतीस पात्र झालो होतो. पूर्ण तयारीनिशी मुलाखत दिली व आता वाट पाहत होतो निकालाची. सहा महिन्याचे जॉब कॉन्ट्रॅक्ट संपवून मी निकालापूर्वी घरी आलो. जून महिना उजाडला. चिंता वाटू लागली. निकालाच्या टेन्शनमुळे रात्रभर झोप येत नसे. अशा वेळी आई म्हणत असे, ''चिंता नको करूस. तू नक्की पास होशील आणि पहिल्या शंभरमध्ये येशील.'' अखेर दिनांक १२ जून २०१४ रोजी दु. ३.०० वा. निकाल जाहीर झाला. मी पास झालो होतो आणि आईच्या म्हणण्याप्रमाणे माझी रँक ८४ वी म्हणजे शंभराच्या आत आली होती. आनंदाश्रू अनावर झाले व आईला बिलगलो. सुमारे अर्धातास आम्ही केवळ आनंदाने रडत होतो.

अशाप्रकारे माझा यु.पी.एस.सी.चा प्रवास झाला. सर्व कष्टाचे चीज झाले[2].

♦♦♦

---

**अवघड शब्दांचे अर्थ : १. शवविच्छेदन** – मृत्यूचे कारण शोधण्यासाठी मृतदेहाची चिरफाड केली जाणे **२. चीज होणे** – कष्ट सफल होणे

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) २०११ साली परीक्षा दिल्यानंतर कोणत्या पदावर काम केले?

२) पैशाची अडचण दूर करण्यासाठी ते कुठल्या विभागात रुजू झाले?

३) विजय राठोड यु.पी.एस.सी.ची परीक्षा कोणत्या साली पास झाले?

४) शिक्षण पूर्ण करण्यासाठी आईने त्यांना कशाप्रकारे मदत केली?

पुस्तकांच्या सूचीसाठी QR Code स्कॅन करा.

यासोबतच ललित लेखमालेची याच प्रकारातील ४० पुस्तकेही सवलतीच्या किंमतीत रु. ५००/–मध्ये उपलब्ध! (साठा मर्यादित)

संपर्क : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०. ☎ ०२०–२४२०७१ ७४/७५, ऑनलाइन खरेदीसाठी www.jpprakashane.org